ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.
**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/U/154/2008/75/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Baburao Laxmanrao Saraikar, Plot No.13'1, Deogiri Colony, Khokadpura, Aurangabad.(Con. No. 490010355351).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Baburao Laxmanrao Saraikar, Plot No.13'1, Deogiri Colony, Khokadpura, Aurangabad.

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of faulty bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **25.11.2008 at 12.30 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**

Shri Baburao Laxmanrao Saraikar,
Plot No.13'1, Deogiri Colony,
Khokadpura, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५४/२००८/७५**

**तक्रार दाखल दिनांक ;- १९/११/२००८**
**निकाल दिनांक ;- १८/०१/२००९**

**श्री बाबुराव लक्ष्मणराव सराईकर,**
**प्लॉट नंबर १३/१, देवगिरी कॉलनी,**
**खोकडपुरा, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०३५५३५१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १९/११/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन खोकडपुरा, औरंगाबाद येंथील स्वतःच्या घरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०३५५३५१ असा आहे. दिनांक २२/०९/२००८ रोजी त्यांचे जुने मीटर काढुन त्याजागी नवीन मीटर बसविण्यात आले दिनांक ०७/१०/२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना ११/१०/२००८ रोजी मीटरच्या तपासणी करीता उपस्थित राहण्यासाठी पत्र देण्यात आले. सदरील पत्र हे प्रत्यक्षात १३/१०/२००८ रोजी त्यांना मिळाले व याबाबत विचारणा केली असता त्याच पत्रावर महावितरणच्या संबंधित प्रतिनिधीने ११/१०/२००८ ही तारीख खोडुन त्यावर १४/१०/२००८ रोजी ही तारीख लिहीली. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिनांक १४/१०/२००८ रोजी ते मीटर तपासणीसाठी गेले असता तुमच्या मीटर मध्ये कोणताही दोष नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. महावितरण वीज कंपनीतर्फे त्यांना ६०००/-रूपयाचे असेसमेंट व ४०००/-रूपयाचे तडजोडीचे बिल देण्यात आले. अर्जदाराने य बिलाबाबत केलेल्या तक्रारीची दखल महावितरण कंपनीने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन ही बिले रद्द करण्याबाबत तसेच या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत होणार नाही याबाबत महावितरण कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २५/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री बाबुराव सराईकर उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. उपकार्यकारी अभियंता श्री नलबलडवार तसेच श्री कुलकर्णी कनिष्ठ लेखाधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदाराच्या जुन्या मिटरची चाचणी केल्यानंतर ते ६२.६४/ मंद गतीचे फिरत असल्याचे अडळुन आल्यामुळे तसेच मिटरचे सिल तुटलेले आढळल्यामुळे अर्जदारास वीज कायदा २००३ मधील कलम १३५ व १३८ नुसार वीज चोरीचे बिल देण्यात आल्याचे व ते योग्य असल्याचे म्हटले आहे. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यावर महावितरण कंपनीतर्फे स्थळ पाहणी अहवाल, मीटर चाचणी अहवाल ईत्यादी कागदपत्रे मंचात दाखल करण्यात आलेली नसल्यामुळे तसेच अर्जदारास देण्यात आलेले बिल हे प्रोव्हीजन बिल असल्याचे आडळुन आल्यामुळे अर्जदाराचा विज पुरवठा खंडीत करू नये असा अंतरिम आदेश पारीत करून पुढील सुनावणी दिनांक ०५/१२/२००८ रोजी घेण्याचे निश्चत केले.

३) दिनांक ०५/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास वीज कायदा २००३ मधील कलम १३५ व १३८ नुसार देण्यात आलेले वीज चोरीचे बिल चुकीचे असल्याचे मान्य करून कलम १२६ अंतर्गत बिल आकारणी करण्याची तयारी दर्शविली.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून सदरील प्रकरण हे वीज कायदा २००३ मधील कलम १२६ अंतर्गत असल्यामुळे व या कलमा अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या तक्रारी मंचाच्या कार्याक्षेत्राबाहेर असल्यामुळे मंच अर्जदाराची तक्रार खारीज करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.


जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५४/२००८/७५** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री बाबुराव लक्ष्मणराव सराईकर**
**प्लॉट नंबर १३/१, देवगिरी कॉलनी,**
**खोकडपुरा, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१५४/२००८/७५ )

आपण दिनांक १९/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**